# लाल बावट्याला वास्तव कळले हेच मोर्चाचे खरे यश

**संपादकीय**

जयश्री खाडिलकर-पांडेकृत

२०१७ साली शेतकऱ्यांचे फार मोठे आंदोलन पुणतांबेच्या गावकऱ्यांनी सुरू केले आणि ते वादळासारखे पेटत गेले. संपूर्ण कर्जमाफीसाठी शेतकरी रस्त्यावर उतरले. राजू शेट्टी, रघुनाथ पाटील आणि इतर शेतकरी नेत्यांनी या आंदोलनाचे नेतृत्व केले आणि ११ जून २०१७ रोजी राज्य सरकारशी प्रदीर्घ बैठक झाली. यावेळी कर्जमाफी काही अटींसह मान्य करण्याचा निर्णय सुकाणू समितीने घेतला. कर्जमाफी देणार नाही म्हणणारे सरकार झुकले आणि अटींसह का होईना पण कर्जमाफी मंजूर करावी लागली.

या बैठकीत अजित नवले होते. ते बैठक सुरू असताना तडकाफडकी बाहेर आले आणि सुकाणू समितीवरच त्यांनी प्रसारमाध्यमांसमोर आरोप केले. शेतकरी नेते मॅनेज झाले असे वातावरण अजित नवलेंमुळे निर्माण झाले. सुकाणू समितीने मिळविलेल्या कर्जमाफीच्या यशाला त्यांनी गालबोट लावले. त्यानंतर आता एक वर्षानी अजित नवले यांच्याच नेतृत्वाखाली स्वतंत्र मोर्चा निघाला. यावेळी बैठकीत कर्जमाफी, वीजबिलमाफी, हमीभाव, पेन्शन, दुधाला ४० लीटर भाव या मागण्या होत्या आणि मागण्या पूर्ण झाल्याशिवाय हलणार नाही, अशी ललकारी होती. प्रत्यक्षात या महत्त्वाच्या मागण्या मान्य झाल्या नाहीत. असे असताना सुकाणू समितीच्या बैठकीतून बाहेर येऊन आरोप करणारे अजित नवले यावेळी गप्प का बसले? चार-पाच छोट्या मागण्या मान्य झाल्यावर त्यांनी आंदोलन कसे संपविले?

याचे कारण आज अजित नवलेंचा मोर्चा होता. आंदोलन छेडणे आणि ते योग्य वेळी संपवणे ही नेत्याची मोठी जबाबदारी असते. आज अजित नवलेंना या जबाबदारीचा साक्षात्कार झाला असेल. आंदोलनात एकेक पाऊल पुढे जायचे असते, आततायीपणा उपयोगाचा नसतो. सुकाणू समितीचे नेते मॅनेज झाले हा आरोप करणाऱ्या अजित नवलेंना आज अखेर वास्तवाची जाणीव झाली आणि त्यांनी आंदोलन आटोपते घेतले. लाल बावट्याला वास्तव समजले आणि मान्य करावे लागले, हेच या मोर्चाचे सर्वात मोठे यश आहे.